जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१६/०१०/२०२३
## दि.१५/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५०१/२०२३,भादविक ३०७,५०४,५०६,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | केतन जागडे,वय-२४ वर्षे,रा.रायकर मळा,धायरी,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचा एक साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/१०/२०२३ रोजी रात्रौ २०/३० वा.मारुती मंदिरा समोर,धायरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र निरंजन लायगुडे याचेसह सदर ठिकाणी उभे असताना,फिर्यादी यांचे ओळखीचे नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,जुन्या भांडणाचा राग मनात धरून,तुला लय मस्ती आलीय,तुला आज जीवंत सोडणार नाही असे म्हणुन त्याचे हातातील धारधार हत्याराने फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने धारधार हत्याराने त्यांचे डोक्याचे मागील बाजुस तसेच डाव्या हाताचे मनगट व बोटावर वार करून,त्यांना गंभीर जमखी करून, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, भरत चंदनशिव ९६२३३१४१२७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे १०६६/२०२३,भादविक २७९,३३८,३०४(अ),४२७,मोवाका.१८४,११९/१७७, १३४(अ)(ब) |
| **फिर्यादी** | शरद सनादे,वय-२८ वर्षे,रा.प्रेमनगर वसाहत,मार्केटयार्ड,पुणे |
| **आरोपीत** | डंपरवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/१०/२०२३ रोजी १३/१५ वा. व्ही.व्ही.आय.टी.कॉलेज कोंढवा,पुणे येथील सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे मावशीचे पती अशोक बसण्णा अस्टगे हे मोपेड दुचाकीवरून जात असताना,नमुद इसमाने त्याचे ताब्यातील डंपर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोपेड दुचाकीस्वार अशोक बसण्णा अस्टगे यांना पाठीमागुन जबर ठोस मारून,मोपेडचे नुकसान करून,त्यांना गंभीर जखमी करून,त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, रासकर ८६८९९४५९९९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ७०३/२०२३,भादविक ३५३,३४१,३४,मोवाका.क.१८४,महा.पो.का.क.११०/११७ |
| **फिर्यादी** | तौसीफ सैय्यद, चंदननगर पो स्टे पुणे शहर |
| **आरोपीत** | दोन महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/१०/२०२३ रोजी रात्री २०/४५ वा. ते २१/१५ वा.चे दरम्यान पोल्ट्री चौक खडकी ते संगमवाडी बीआरटी बस स्टॉप जवळील फुटपाथ जवळ |

| | |
|---|---|
| **तपशिल** | पोल्ट्री चौक खडकी ते संगमवाडी बीआरटी बस स्टॉप जवळील फुटपाथजवळ यातील नमुद महिला यांनी आपसात संगनमत करून,त्यांचे दुचाकीवरुन भरधाव वेगाने येवुन फिर्यादी यांचा पाठलाग करुन,फिर्यादी हे त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांचेसह शासकीय वाहनातुन शासकीय कामासाठी जात असताना,संगमवाडी येथे सदर शासकीय वाहनास त्यांची दुचाकी आडवी लावुन,त्यांचे वाहन थांबवुन,रस्ता बंद करुन शासकीय वाहनातील वरिष्ठ अधिकारी व फिर्यादी यांचेसोबत वाद घालुन,माझा जबाब तुम्ही आताच घ्या,तुम्हाला माझे तक्रारीपेक्षा बंदोबस्त महत्वाचा आहे काय असा वाद घालुन,संगमवाडी बीआरटी बस स्टॉप जवळील फुटपाथ जवळ फिर्यादी हे शासकीय वाहनातुन खाली उतरले असता,त्या दोघी महिला फिर्यादीचे अंगावर धावुन जावुन,त्यांना धक्का मारुन मागे ढकलुन देवुन,फिर्यादी यांचे शासकीय कामात अडथळा आणला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. प्रेरणा कुलकर्णी ९०८२५३३०९६ |
| ४ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ५१२/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-७२ वर्षे,रा.बी.टी.कवडे रोड,वानवडी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/१०/२०२३ रोजी रात्री १०/०० वा.ते दि.१५/१०/२०२३ रोजी पहाटे ०६/०० वा.भैरवनाथ मंदिर,भैरोबानाला,सोलापूर रोड,वानवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वानवडीगांव देवस्थान नावाची ट्रस्ट असुन,त्यांचे ट्रस्ट अंतर्गत भैरोबा नाला सोलापुर रोड,वानवडी,पुणे येथे भैरवनाथ मंदिर आहे. कोणीतरी अज्ञात इसमाने भैरव नाथ मंदिराचे शाळेचे गेट मधुन आंत येवुन,भैरवनाथ मंदिराचे सिमा भिंतीवरुन मंदिराचे आवारात आत प्रवेश करुन,मुख्य मंदिरा मधील तांब्याची कळशी,दानपेटी फोडुन,त्यातील ३,०००/- रुपये रोख रक्कम तसेच भंडार गृहातील आणि तांबे-पितळीची भांडी,समई चोरी करून नेली आहेत. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, एस.एस.घोडके ९३७३९१६७७६ |
| ५ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ४८४/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५९ वर्षे,रा.तुकारामनगर,चंदननगर,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/१०/२०२३ रोजी १७/३० वा. ते दि.११/१०/२०२३ रोजी १९/१५ वा.चे दरम्यान कात्रज ते तुकाराम नगर बस स्टॉप प्रवासा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पीएमपीएमएल बसने कात्रज ते तुकारामनगर बस स्टॉप असा प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे डाव्या हातातील सोन्याची पाटली ८०,०००/- रु किंमतीची त्यांचे नकळत काढुन चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, केदार ९६३७९७७७५९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**